# मुलींच्या शिक्षणावर आधारित 'सोंगटी' नाटक पाहण्याची संधी

## कै. बाबूराव सणस कन्याशाळेत होणार प्रयोग

पुणे, (प्रतिनिधी) : पंख सामाजिक संस्था व क्रिकहिल फाऊंडेशनच्या शाळांगण प्रकल्पाअंतर्गत कै. बाबूराव सणस कन्याशाळा, मंगळवार पेठ येथे दि. ६ जानेवारी रोजी दुपारी ३:१० वाजता मुलींच्या शिक्षणावर आधारित 'सोंगटी' या नाटकाचा प्रयोग सादर केला जाणार आहे. मराठी अभिनेत्री माधवी सोमण, अंजली धारू या हा प्रयोग सादर करणार आहेत.

नुकतीच सावित्रीबाई फुले यांची जयंती झाली. त्यानिमित्त नाटकाचा विषय हा मुलींच्या शिक्षणावर आधारित असेल. आजच्या युगात मुलींचे शिक्षण किती महत्त्वाचे आहे व कितीही खडतर जीवन वाट्याला आले तरी संघर्ष करून गरीब घरातील सोंगटी शिक्षण पूर्ण करून कशी स्वतःच्या पायावर उभी राहते, हे नाटकातून दाखविले जाणार आहे.

या कार्यक्रमाला कै. बाबूराव सणस कन्याशाळा, वसंतदादा पाटील शाळा व कर्मवीर भाऊराव पाटील शाळेच्या मुली आणि त्यांचे पालक उपस्थित असणार आहेत. हा कार्यक्रम विनामूल्य सर्वांसाठी खुला असणार आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण मंडळ अध्यक्षा वासंती काकडे आणि शिक्षणाधिकारी दिपक माळी उपस्थित असणार आहेत.